पुण्य नगरी ■ मंगळवार, ३ सप्टेंबर २०१९ 3

# महाडिक कॉलेजमध्ये आय.आय.टी. मुंबईच्या व्हर्चुअल लॅब नोडल सेंटरला मान्यता

**इस्लामपूर / प्रतिनिधी**

महाडिक अभियांत्रिकी महाविद्यालयास सन २०१९-२० करता आय.आय.टी. मुंबईच्या व्हर्चुअल लॅब नोडल सेंटरला मान्यता देण्यात आल्याची माहिती संस्थेचे कार्यकारी संचालक महेश बी. जोशी यांनी दिली. अशी मान्यता मिळवणारे पश्चिम महाराष्ट्रातील हे पहिलेच महाविद्यालय आहे.



इस्लामपूर : महाडिक अभियांत्रिकीमध्ये आयोजित कार्यशाळेत बोलताना प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी व अन्य.

महाविद्यालयातर्फे व्हर्चुअल लॅब-अटूल इन इंटरनेट बेस्ड एक्सपेरीमेंटेशन या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले होते. या कार्यशाळेस पुष्पदीप मिश्रा, प्रोजेक्ट कोऑर्डिनेटर, आय.आय.टी. मुंबई तसेच तनुजा खटावकर, रिजनल सेंटर कोऑर्डिनेटर, मीनल अपसंगी व मनीष नागोशे हे उपस्थित होते. कार्यशाळेची सुरुवात प्राचार्य डॉ. व्ही. ए. कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाने झाली. प्रमुख पाहुणे पुष्पदीप मिश्रा यांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकाद्वारे देण्यात येणाऱ्या शिक्षणाचे महत्व सांगितले. यावेळी ते म्हणाले, आय. आय.टी. मुंबईच्या व्हर्चुअल लॅबचा विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी फायदा करून घ्यावा व या संधीचा उपयोग करून अद्ययावत ज्ञान संपादन करावे. तनुजा खटावकर यांनी पी. व्ही. जी. कॉलेज पुणे यांचा नोडल सेंटरकडून रिजनल सेंटरपर्यंतचा प्रवास विशद केला. मीनल अपशिंगे व प्रा. नागोशे यांनीही मार्गदर्शन केले. उपस्थित शिक्षकांसाठी व्हर्चुअल लॅबचे प्रात्यक्षिक दाखवण्यात आले. सर्व शिक्षकांनी तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या उपस्थित व्हर्चुअल लॅबद्वारे प्रॅक्टिकल करण्याचे तंत्र आत्मसात केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील सर्व शिक्षक उपस्थित होते. प्रा. नीलेश साने यांनी आभार मानले.